दि. १८/०५/२०२३

लोकमत पा.न.१

# अपात्रता कारवाईसंदर्भात ठाकरे-शिंदे गटांना नोटिसा

## पक्षाची घटना मागविणार, कार्यवाही सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या



निर्देशानुसार आमदारांच्या अपात्रतेबाबत पुढील कार्यवाहीला विधिमंडळाने सुरुवात केली आहे. विधानसभा अध्यक्षांकडे ठाकरे व शिंदे गटाच्या यासंदर्भातील पाच याचिका असून त्याबाबत दोन्ही गटांना नोटिसा बजावून त्यांचे स्पष्टीकरण मागविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे शिवसेना पक्ष कुणाचा हे ठरविण्यासाठी दोन्ही पक्षांचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्याकडून पक्षाची घटना, तसेच बैठकांमध्ये झालेल्या ठरावांची प्रत मागविण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १६ आमदारांच्या अपात्रतेबाबतचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपवला. हा निर्णय घेण्याआधी कोणत्या गटाचा शिवसेना पक्ष हा निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर घेणार आहेत. हे ठरविण्यासाठी आता दोन्ही पक्षांच्या प्रमुखांकडून पक्षाच्या घटनेची प्रत मागविण्यासाठी नोटीस पाठविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पक्षातील नेमणुकांबाबत झालेल्या बैठका आणि त्यात झालेले ठराव यांच्यासंदर्भातील कागदपत्रे मागविण्यात येणार आहेत.

### पाच याचिकांवर निर्णय घ्यावा लागणार

- सुरुवातीला ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांच्याकडून बजावण्यात आलेला व्हिप. त्याचे पालन न केल्याने १६ आमदारांना अपात्र ठरविण्याच्या मागणीबाबतची याचिका.
- शिंदे गटाकडून भरत गोगावले यांना प्रतोद म्हणून नियुक्त केल्यानंतर त्यांनी ठाकरे गटातील आमदारांना पाठविलेली नोटीस.
- त्यांना अपात्र ठरविण्यासाठी विधानसभा अध्यक्षांकडे केलेली मागणी अशा पाच याचिका परस्परांविरोधात दाखल झाल्या आहेत.
- त्यामुळे प्रभू आणि गोगावले यांना या नोटिसा पाठविण्यात येणार आहेत. व्हिप, गटनेत्यांची, अध्यक्षांची केलेली निवड याबाबत नोंदविण्यात आलेल्या आक्षेपांसंदर्भात स्पष्टीकरण विचारण्यात येणार आहे.

### दोन आमदार वगळले

- एकमेकांविरोधात करण्यात आलेल्या याचिकांमध्ये ५४ आमदारांचा समावेश आहे.
- मात्र, यामधून ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे आणि ऋतुजा रमेश लटके यांना वगळण्यात आले आहे.

लोकमत पु.पा.न.१

# भांडणात मुलाने बापाला उचलून खाली आपटले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** शेजारी राहणाऱ्या मुलाने आपल्या घरासमोर सामान ठेवल्याचा जाब बापाने विचारला असता मुलाने बापास लाथाबुक्क्यांनी मारहाण करत उचलून जमिनीवर आपटल्याची घटना भाईंदरमध्ये घडली.



भाईंदर पश्चिमेस गणेश आनंदनगरच्या शिमला गल्लीत जयसुकलाल होसीलाप्रसाद तिवारी (५८) हे पत्नी गीतादेवी व मुलगा असोनी कुमारसह राहतात. मजुरी काम करणाऱ्या जयसुकलाल यांच्या शेजारीच त्यांचा मोठा मुलगा विकास (३५) हा त्याच्या पत्नी व कुटुंबासह राहतो.

विकास हा घरी असताना १४ मे रोजी त्याने त्याच्या घराजवळील सामान वडिलांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत ठेवले. वडिलांनी त्याला, माझ्या घरासमोर तुझे सामान का ठेवले, असा जाब विचारला. त्याचा राग आलेल्या विकास याने वडिलांना उलटसुलट बोलत लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. त्याने वडिलांना दोन्ही हातानी उंच उचलून खाली जमिनीवर आपटले. तसेच उजव्या हातावर लाथेने मारले. गीतादेवी आणि विकासच्या पत्नीने जयसुकलाल यांना विकासाच्या तावडीतून सोडवले.

लोकमत पा.न.२

# जामीन देण्यासाठी एक लाख मागितले

## पोलिस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल

**नालासोपारा :** एका आरोपीला जामीन मिळवून देण्यासाठी एक लाखाची लाच मागणाऱ्या तुळिंज पोलिस ठाण्याच्या पोलिस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामचंद्र शेंडगे असे या लाचखोर पोलिसाचे नाव आहे. ठाण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी रात्री उशिरा हा गुन्हा दाखल केला.

फिर्यादी यांचा केटरिंग आणि मंडप डेकोरेटरचा व्यवसाय आहे. त्यांच्याविरोधात तुळिंज पोलिस ठाण्यात फसवणुकीचा एक गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक रामचंद्र शेंडगे यांच्याकडे होता.

CamScanner

CamScanner

दि. १८/०५/२०२३

लोकमत पा. नं. ८

## २५ दिवसांपासून मुली रस्त्यावर, त्यांना न्याय द्या...




कुस्तीपटू बजरंग पुनिया, विनेश फोगट, साक्षी मलिक आणि संगीता फोगट यांनी नवी दिल्लीत बुधवारी मोर्चा काढला. भारतीय कुस्ती महासंघाचे प्रमुख ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या निषेधार्थ हे कुस्तीपटू आंदोलन करत आहेत.

पुण्य नगरी पु. पा. नं. १

# मीरा–भाईंदर शहरात एकही अनधिकृत शाळा नाही

## शिक्षण विभागाचे स्पष्टीकरण

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका शिक्षण विभागाने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शहरातील ७ शाळा अनधिकृत घोषित केल्या होत्या. परंतु या वर्षी केलेल्या सर्वेक्षणात शहरात एकही अनधिकृत शाळा नसल्याचे शिक्षण विभागाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

मीरा-भाईदर महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून दरवर्षी सर्वेक्षण करून शहरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली जाते. त्यानुसार महापालिका शिक्षण विभागाने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शहरातील ७ शाळा अनधिकृत असल्याचे घोषित केल्या होत्या. त्यानंतर महापालिकेने त्या शाळांना बंद करण्याच्या नोटिसा दिल्या. त्यातील ४ शाळा बंद करण्यात आल्या, तर तीन शाळांकडून १ लाखांचा दंड वसूल केला होता. या अनधिकृत शाळांमध्ये भाईंदर पूर्वेकडील इंद्रलोकमध्ये असलेली प्रषिक मराठी शाळा, इंद्रलोक फेज ३ मध्ये असलेली नाईन प्लॅनेटस प्री प्रायमरी इंग्लिश शाळा, गोडदेव नाका येथील बॉर्डर हायस्कूल, काशिमीरा येथील ट्रिनिटी पब्लिक शाळा, मीरा रोडच्या पेणकरपाडा येथील सेंट डॅनिएल शाळा, हाटकेशच्या मंगलनगर येथील अभिलाषा हायस्कूल व नयानगर येथील इक्रा इस्लामिक स्कूल ॲण्ड मॅकटॅब या ७ शाळांचा समावेश होता. त्यानंतर यातील चार शाळा बंद करण्यात आल्याचे शिक्षण विभागाने सांगितले आहे. तर दोन शाळांनी शासनाची परवानगी मिळण्यासाठी प्रयत्न केले; परंतु त्यांना परवानगी मिळाली नसल्यामुळे त्या शाळांनी या वर्षीपासून शाळा बंद करण्यात येईल, असे पत्र शिक्षण विभागाला दिले आहे. तर एका उर्दू शाळेला केंद्र शासनाची परवानगी आहे, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे. या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळा बंद करणार असल्यामुळे दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. हटकेश येथील अभिलाषा शाळेने तर गेल्या महिन्यात चौथीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची फक्त ४ हजार रुपये फी बाकी होती. त्यामुळे परीक्षेला बसू दिले नाही. त्यामुळे या शाळांनी वर्षभर विद्यार्थ्यांकडून फी वसूल करून लूट केली आहे. त्यामुळे अनधिकृतपणे शाळा चालवून अशी मनमानी करून विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या शाळेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी विद्यार्थ्यांच्या पालकाने महापालिका व पोलीस विभागाला पत्र देऊन केली आहे. या शाळा पुन्हा सुरू होणार नाहीत, शिक्षण विभागाने याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच परवानगी नसताना शाळा सुरू ठेवल्यास प्रति दिन दंड आकारण्यात येणार होता. तो दंड महापालिकेने त्या शाळेकडून वसूल करावा, अशी मागणी केली जात आहे. आयुक्त दिलीप ढोले यांनी अनधिकृत शाळेबाबत शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या सक्त सूचना दिल्या असून, मीरा-भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात यापुढे एकही शाळा अनधिकृतपणे सुरू राहणार नाही, असे आदेश दिले आहेत.

CamScanner

दि. १८/०५/२०२३

पुण्य नगरी पु.पा.न.४

# 'समर वंडरलँड' मध्ये मुलांची मज्जाच मज्जा

## ५० हजार नागरिक फेस्टिव्हलला भेट देणार असल्याचा दावा

**मीरा रोड :** सध्या शाळांना सुट्टी असून अनेक मुले घरात बसून कंटाळतात. या मुलांना विरंगुळा, खेळ आणि त्यांच्यातील कला सादर करण्यासाठी एखादे व्यासपीठ मिळावे, यासाठी मीरा-भाईंदर शहरात चारदिवसीय समर वंडरलँड फेस्टिव्हल आयोजित करण्यात आला आहे. हा फेस्टिव्हल १८ ते २१ मे दरम्यान होणार असून चार दिवसात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. चारही दिवस लाइव्ह म्युझिक, फूड स्टॉल, गेम झोन, विविध कार्यशाळा आणि खरेदी करण्यासाठी शॉपिंग विभाग येथे असतील. चार दिवसात ५० हजार नागरिक या फेस्टिव्हलला आपल्या कुटुंबासह भेट देतील असा अंदाज आहे, अशी माहिती आयोजक पूर्वेश सरनाईक यांनी दिली.

मीरा-भाईंदर शहरात पहिल्यांदाच समर वंडरलँड हा फेस्टिव्हल आयोजित केला आहे. अत्यंत आकर्षक पद्धतीने फेस्टिव्हलचे डिझाईन केले गेले आहे. मीरा-भाईंदर महापालिका मैदान , सेव्हन स्केवर शाळेजवळ, रामदेव पार्क रोड, मीरा रोड येथे हा फेस्टिव्हल होणार आहे.



प्रतिकात्मक

१८ ते २१ मे असे चार दिवस फेस्टिव्हल होणार असून सायंकाळी ४ वाजता आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते 'समर वंडरलँड'चे उद्घाटन होणार आहे. या समर वंडरलँडला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही भेट देणार असल्याची माहिती पूर्वेश सरनाईक यांनी दिली आहे. लहान मुलांना गेम खेळता यावेत यासाठी १० हजार फुटांचा गेम झोन येथे तयार करण्यात आला आहे. येथे मोफत प्रवेश आहे आणि नाव नोंदणी मात्र करावी लागेल. ४ दिवस सायंकाळी ७ ते १० यावेळेत लाइव्ह म्युझिक प्रसिद्ध गायक सादर करतील. तसेच चारही दिवस लहान मुलांना विविध कार्यशाळा देण्यात येणार असून लहान मुलांना चित्रकला, विविध वस्तू बनविणे व हस्तकला यासह कार्यशाळेतून मुलांना व्यासपीठ दिले जाईल.

शहरातील नागरिकांनी जरूर फेस्टिव्हलला भेट द्यावी, असे आवाहन पूर्वेश सरनाईक यांच्या टीमने केले आहे. अनेक लोक आपल्या घरात पाळीव प्राण्यांवर स्वतःच्या मुलांप्रमाणे प्रेम करतात. घरातील सदस्य असल्याप्रमाणे वागवतात. हा 'पेट फ्रेंडली' फेस्टिव्हल असल्याने काही नागरिक आपल्या पाळीव प्राण्यांसोबत या फेस्टिव्हलमध्ये येऊ शकतील.

पुढारी पा.न.३

## मांडवी वनपरिक्षेत्र कर्मचाऱ्याला अडीच लाखांची लाच घेताना अटक

**खानिवडे :** डहाणू वनविभागाच्या मांडवी वनपरिक्षेत्रातील वनपालाला अडीच लाखांची लाच घेताना लाचलुचपत विभाग ठाणे यांनी रंगेहात पकडले आहे. सलग दोन महिन्यात मांडवीच्याच दोन लाचखोरांना पकडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या बाबतचे सविस्तर वृत्त असे आहे की, मांडवी वनपरिक्षेत्रात कार्यरत असलेले वनपाल रज्जाक रशीद मन्सुरी, ५१ या कर्मचाऱ्याला आणि त्याचा साथीदार दानियाल हाजी खान, ५२ यांनी वन जमीनीवर वाढीव बांधकाम केल्याप्रकरणी कारवाई न करण्यासाठी पाच लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यापैकी पहिला हप्ता लाख रुपये घेताना मांडवी वनपरिक्षेत्र कार्यालयात च लाचलुचपत विभागाकडून रंगेहात पकडण्यात आले आहे. मांडवी वनपरिक्षेत्र कार्यालयातील ही दोन महिन्यातील दुसरी घटना असून या आधी मार्च महिन्यात रणजित दिनकर डोळे या कर्मचाऱ्याला वीस हजारांची लाच घेताना पेल्हार येथे पकडण्यात आले होते. वसई-विरार शहराचा भाग असलेल्या या परिक्षेत्रात वनविभागाच्या अनेक जागांवर अनधिकृत बांधकाम होत असून या बांधकामांना झाकण्यासाठी वनविभागाकडून लाचेची मागणी करण्यात येते. मात्र यामुळे वसईची निसर्ग संपदा या लाचखोरांमुळे धोक्यात आली आहे. त्यामुळे त्यांना पाठबळ देणाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे. सदर कारवाई ही लाचलुचपत विभाग ठाणे एसीबीच्या पोलीस अधीक्षक अश्विनी पाटील यांच्या पथकाने केली आहे.

पुढारी पा.न.४

## संजय राऊत यांच्याविरोधात शिरसाट यांचा हक्कभंग प्रस्ताव

**मुंबई :** विधिमंडळ हे चोर मंडळ आहे, असे वादग्रस्त वक्तव्य करणारे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत हे पुन्हा एकदा अडचणीत सापडले आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य आणि टिका केल्याप्रकरणी शिवसेनेचे आमदार, प्रवक्ते संजय शिरसाट यांनी राऊत यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल केला आहे. राज्यातील सत्तासंघर्षाच्या निकालादरम्यान सर्वोच्च न्यायालयाने १६ अपात्र आमदारांचा निर्णय विधानसभेच्या अध्यक्षांना घेण्यास सांगितले आहे. न्यायालयाच्या या निर्णयानंतर संजय राऊत हे विधानसभा अध्यक्षांच्या विरोधात वादग्रस्त वक्तव्य करीत असल्याचा आरोप संजय शिरसाट यांनी केला आहे. विधानसभा अध्यक्ष हे विधिमंडळाच्या कार्यप्रमाणालीत कोणत्याही पक्षाचे नेतृत्व करत नाहीत. ते सर्वच पक्षांचे विधिमंडळातील पीठासीन अधिकारी असतात. त्यामुळे त्यांच्यावर खोटे, बेफाम आरोप करून जनमानसात त्यांची प्रतिमा मलिन करण्याबरोबरच विधिमंडळाचे पावित्र्य धोक्यात आणण्याचे काम राऊत करीत आहेत. त्यांच्याकडून विधानसभा अध्यक्षांवर केले जाणारे आरोप हे त्यांना धमकावण्यासाठी केले जात आहेत. ही विधानसभा अध्यक्षांची मानहानी असून राऊत यांच्याकडून विधानसभा अध्यक्षांच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रकार हक्कभंगात मोडत असल्याची आमची धारणा आहे, असे पत्र संजय शिरसाट यांनी विधानसभा अध्यक्षांना दिले आहे.

CamScanner

CamScanner

दि. १८/०५/२०२३

पुढारी पा. न. ५

## वालकरच्या स्मृतिदिनानिमित्त मूकमोर्चा

**वसई :** दिल्लीमध्ये निर्घृण हत्या करण्यात आलेल्या वसईच्या बहुचर्चित स्व.श्रद्धा वालकर हत्याकांडास आज एक वर्ष पूर्ण झाले. श्रद्धाच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त वसईकरांनी तिला श्रद्धांजली म्हणून, तसेच अद्यापही शिक्षा न झालेला मारेकरी आफताब पुनावाला यास फाशी होऊन, न्याय मिळावा, या मागणीसाठी वसईतील श्रद्धाच्या घरापासून ते वसई तहसील कार्यालयापर्यंत मूक मोर्चाचे आयोजन आज करण्यात आले होते. आज संध्याकाळी ४ वाजता जी जी कॉलेज वसई पश्चिम येथील श्रद्धा राहत असलेल्या संस्कृती इमारतीपासून ह्या मूक मोर्चास सुरुवात झाली. नारीशक्ती सेवा फाउंडेशनतर्फे काढण्यात आलेल्या या मूक मोर्चात श्रद्धाचे वडील विकास वालकर, भाजपचे ज्येष्ठ नेते, तथा माजी खासदार किरीट सोमय्या, वसई विरार भाजपचे शेखर धुरी, उत्तमकुमार नायर, राजेंद्र म्हात्रे आणि सामान्य नागरिक उपस्थित होते. हा मूक मोर्चा वसई पारनाका मार्गे जाऊन, तहसील कार्यालयासमोर त्याचे रूपांतर श्रद्धांजली सभेत झाले. श्रद्धाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून यावेळी तिला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

पुढारी पु. पा. न. १

## मोबाईल चोरी; तिघांना अटक

मिरारोड : काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत देव गोपी शर्मा ( ३० ) हे ३ मे रोजी डॉन बॉस्को शाळेच्या रस्त्याने जात असताना ३ अनोळखी इसम रिक्षामधुन येवून शर्मा यांना सही है वो असे बोलून त्यांच्या गालावर चापट मारुन त्यांच्या खिशातील मोबाइल फोन जबरीने चोरी करून नेला होता. त्याबाबत काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. पोलीस गस्त करीत असताना वेस्टन हॉटेलकडुन हाटकेश कडे जाणारे रोडवर आरोपी हे ऑटो रिक्षा क्र. एम.एच. ०४ डी २४६७ मध्ये संशयास्पदरित्या वावरत असताना आढळून आले. गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या रिक्षाचा पाठलाग करून इरशाद अब्दुलरीफ अन्सारी (३०), मोहसीन मेहमुद खान (२६), शाहीद अख्तर अन्सारी (२७ ) सर्व राहणार भिवंडी यांना ताब्यात घेवुन त्यांच्या रिक्षाची झडती घेतली असता त्या रिक्षाचे सिटच्या मागे एक काळ्या रंगाच्या सॅक बॅगेत विविध कंपन्याचे एकूण २७ मोबाईल फोन मिळुन आले. वरील ऐवज नमुद गुन्हयात जबरी चोरी, केलेला असल्याचे निष्पन्न झाले.

पुढारी पु. पा. न. १

## १५ वर्षांपासून फरार गुन्हेगाराला अटक

**मिरारोड :** मांडवी, विरार या ठिकाणी गेल्या १५ वर्षांपूर्वी आरोपीने त्याच्या साथीदारांसह दरोडा टाकून पळून गेला होता. त्याचा तपास करून सुमारे १५ वर्षापासुन ३ दरोडा व २ मोक्का गुन्हयातील पाहिजे आरोपीस मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. मांडवी, विरार या ठिकाणी राहणाऱ्या सौ. रेखा काशिनाथ चौधरी या २१ ऑगस्ट २००८ रोजी रात्री घरात झोपले असतांना टेवर बंडया काळे व त्याचे साथीदारांनी घरात घुसून रेखा यांचे पती यांना जबर मारहाण केली व त्यांच्या अंगावरील १७,००० रु. किमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने घेवून पळून गेले होते. याबाबत विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयातील पाहिजे आरोपी टेवर बंडया काळे, रा. ललगुन, ता. पुसेगांव, जि. सातारा हा गुन्हा केल्यापासुन मिळुन येत नव्हता. आरोपीचा तपास करून आरोपी हा सातारा जिल्हयात असल्याबाबत माहिती मिळवली. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार हे सातारा येथे जावून दरोड्यातील आरोपी टेवर बंड्या काळे याला ताब्यात घेतले.

पुढारी पु. पा. न. २

## कचराप्रश्न युद्धपातळीवर मार्गी लावा -भोईर

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महापालिकेच्या प्रभाग समिती जी अंतर्गत नायगाव पुर्व पट्टीची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून दोन लाखांच्या घरात आहे. विकासाच्या ओघात वसई-विरारधमील शहरी भागांसह गावठाण भागांचे वेगाने नागरीकरण होत असून विकासाचे मोठमोठे प्रकल्प, बहुमजली इमारती, इंडस्ट्रीज, कारखाने, मॉल्स या ठिकाणी उभे राहत आहेत. परंतु वाढत्या लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतीमार्फत गावांना पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधांवर प्रचंड ताण पडत असून त्या अपुऱ्या पडत आहे. महाराष्ट्र शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिकेची राजपत्राव्दारे २१ गावांकरीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे. या गावांमधील कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनून नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरणातील २१ गावांचा कचराप्रश्न युद्धपातळीवर मार्गी लावणेची मागणी माजी सभापती कन्हैया भोईर यांनी मनपा आयुक्त व शहर अभियंत्यांकडे पत्राव्दारे केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने राजपत्राव्दारे २१ गावांकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे. यामध्ये अर्नाळा, अर्नाळा किल्ला, पाटीलपाडा, मुकाम, टेंभी, कोल्हापूर, चंद्रपाडा, टोकरे, खैरपाडा, वासळई, रानगाव, डोलीव, खार्डी, खोचिवडा, पाली, टिवरी, आक्टन, तरखड, मालजीपाडा, सातपाळा, कळंब या २१ गावांचा समावेश आहे. त्यामुळे या गावांना मुलभूत सुविधा पुरवठा करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. या गावांमधील दैनंदिन कचऱ्याचा प्रश्न अत्यंत बिकट झालेला आहे.

CS CamScanner

दि. १८/०५/२०२३

सकाळ पा. न. १

## भाजप, राष्ट्रवादी आणि ठाकरेंची मोर्चेबांधणी

# तयारी निवडणुकांची



मुंबई, ता. १७ : राज्यातील आगामी निवडणुकांसाठी भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. आज भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी मुंबईमध्ये भाजपचाच महापौर बसविण्याचा निर्धार केला. राष्ट्रवादी काँग्रेसनेही तयारीला लागा, असा संदेश दिला आहे. ठाकरे गटानेही कंबर कसली असून उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी सज्ज राहा, असा संदेश दिल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

### महापौर भाजपचाच

भाजपने मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी रणशिंग फुंकले असून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज आगामी महापौर भाजपचाच असेल, असा निर्धार पत्रप्रमुखांच्या मेळाव्यात बोलताना व्यक्त केला. नड्डा यांनी पदाधिकाऱ्यांना जनतेसाठी काम करण्याचा सल्ला दिला. मुंबई महापालिकेची निवडणूक ताकदीने लढून जिंकण्यासाठी जिद्दीने काम करा, असे आवाहनही त्यांनी केले.

उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना भ्रष्टाचारच झाला असून आघाडी सरकारने प्रकल्पांची अडवणूक केली, असा ठपका नड्डा यांनी ठाकरे सरकारवर ठेवला. सध्याच्या डबल इंजिनच्या सरकारमुळे नागरिकांना न्याय मिळत असल्याचेही ते म्हणाले. » पान ७ वर

### तयारीला लागा

महाविकास आघाडीचे सरकार दडपशाही आणि असंविधानिक मार्गाने पाडल्याचा रोष जनमानसांत असून, शिंदे-फडणवीस सरकार विरोधात लाट तयार झाली आहे. त्यामुळे आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या सरकारला नाकारण्याचे मत जनतेने बनवले असल्याने राज्यभरात महाविकास आघाडीमधील सुसंवाद वाढवून एकत्रितपणे निवडणुकांना सामोरे जाण्याची रणनीती आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर समितीच्या बैठकीत आखण्यात आली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. त्यात राज्यातील राजकीय परिस्थिती, कर्नाटकातील काँग्रेसचा विजय, » पान ७ वर

### गाफील राहू नका

राज्यातील सत्तासंघर्षाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाची माहिती घराघरांत पोहोचवा आणि निकालाबाबत निर्माण करण्यात येत असलेला गैरसमज दूर करा, असे आदेश शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना दिले. मुंबई महापालिकेसह राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. त्यामुळे गाफील राहू नका. निवडणुकांसाठी तयार राहा, अशा सूचनाही ठाकरे यांनी केल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांना अपात्र ठरविण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नुकताच निर्णय दिला. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेना » पान ७ वर

सकाळ पा. न. ५

## तीन मित्रांच्या भांडणात एकाची हत्या; दोघे जखमी

नालासोपारा, ता. १७ (बातमीदार) : नालासोपाऱ्यात तीन मित्रांच्या भांडणात एका तरुणाची हत्या; तर दोन जण गंभीर जखमी झाले. एका टी कॅफे सेंटरमध्ये आज दुपारी तीनच्या सुमारास ही घटना घडली. या हत्येचे नेमके कारण स्पष्ट झाले नसून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

रौनक तिवारी असे मृत तरुणाचे नाव असून किशन झा आणि शिवम दुबे अशी जखमींची नावे आहेत. हे तिघेही एकमेकांचे मित्र असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. नालासोपारा पूर्वेला नागेला तलावाशेजारील गालानगर शिवशक्ती चाळीत नमस्ते टी कॉफी सेंटरमध्ये हा प्रकार घडला. तिन्ही मित्र शटर बंद करून आतमध्ये होते. दुकानातून स्फोटाचा आवाज आल्याने स्थानिकांनी अग्निशमन दलाच्या जवानांना बोलावले. आग विझविण्यात आली तेव्हा एकाचा मृतदेह आढळला. दोन जण गंभीर जखमी झाले होते. हत्या झाल्याचा प्राथमिक संशय पोलिसांकडून वर्तविण्यात आला आहे.

> हत्या झाल्याचे प्राथमिक पुरावे सापडले आहेत; पण ही हत्या का व कशासाठी झाली, याचे स्पष्ट कारण समोर आले नाही. आम्ही जखमीचा जबाब घेण्याचा प्रयत्न करत आहोत. सध्या घटनास्थळावरील पाहणी करून हत्येचा गुन्हा दाखल करून तपास करणार आहोत.
>
> - चंद्रकांत जाधव,
> सहायक पोलिस आयुक्त,
> नालासोपारा

CamScanner

CamScanner

दि. १८/०५/२०२३

सकाळ पा. न. ५



नालासोपारा : भरधाव टँकर कार्यालयात घुसल्याने त्याचे तीन तुकडे झाले. कार्यालयाचे मोठे नुकसान झाले.

# भरधाव टँकर कार्यालयात घुसला

नालासोपारा, ता. १७ (बातमीदार) : नालासोपाऱ्यातील बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते व परिवहन समिती सदस्य अमित वैद्य यांच्या कार्यालयात भरधाव वेगात आलेला टँकर घुसल्याची घटना आज सकाळी घडली. टँकर एवढा वेगात होता की विजेच्या खांबाला जोरदार धडक देऊन तो कार्यालयात घुसला तेव्हा विजेचा खांब पूर्णपणे वाकडा झाला, तर कार्यालयाचे मोठे नुकसान झाले. यात जीवितहानी झाली नाही; मात्र मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

हा अपघात नसून घातपात करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप अमित वैद्य यांनी केला असून याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल करणार असल्याचे त्यांनी सांगितले. नालासोपारा पूर्व तुळिंज परिसरातील तुळजाभवानी या इमारतीत बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते तथा पालिकेच्या परिवहन समितीचे सदस्य अमित वैद्य यांचे तळमजल्यावर कार्यालय आहे. या कार्यालयात टँकर घुसला. यात टँकरचे तीन तुकडे झाले आहेत. यात चालक गंभीर जखमी झाला आहे. वाहतूक पोलिसांनी जखमी टँकरचालकाला नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. 'ज्या पद्धतीने टँकर माझ्या कार्यालयात घुसला आहे, त्यावरून हा अपघात नसून घातपात करण्याचा प्रयत्न असल्याचा मला संशय आहे. याबाबत मी तुळिंज पोलिस ठाण्यात तक्रार करणार असून चौकशीची मागणी करणार आहे, असे अमित वैद्य यांनी सांगितले.

सकाळ पु. पा. न. १

# वसई तालुक्यातील रेतीमाफियांना दणका

## चार दिवसांत एक कोटी २० लाखांचा मुद्देमाल नष्ट

नालासोपारा, ता. १७ (बातमीदार) : वसई तालुक्यातील रेती बंदरावर रेती उपसा करून वाहतूक करण्याला बंदी आहे, मात्र रेती माफिया या बंदीला झुगारून राजरोसपणे अनधिकृत रेतीचे उत्खनन करून चोरट्या मार्गाने रेतीची वाहतूक करत आहेत. महसूल विभागाने सलग चार दिवस तालुक्यातील शिरगाव, वैतरणा रेती बंदरांवर छापा टाकून एक कोटी ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. रेती उपसा करणाऱ्या आठ बोटी, नऊ सक्शन पंप पकडून त्या जिलेटीनने उद्ध्वस्त केले आहेत, तर उपसा केलेली रेती पुन्हा समुद्र खाडीत लोटून, किनाऱ्यावरील झोपड्या, कठडे नेस्तनाबूत केले आहेत.

### ड्रोन कॅमेऱ्याची मदत

कारवाईदरम्यान रेती माफिया बोटी, सक्शन पंप घेऊन पळून जाऊ नये, यासाठी ड्रोन कॅमेऱ्याने सर्वप्रथम चित्रण केले. त्यानंतर समुद्र, खाडी किनारी असणाऱ्या बोटी व सक्शन पंपमध्ये जिलेटीन लावून त्या उद्ध्वस्त करून टाकल्या. बोटी नष्ट झाल्या नाहीत, त्यांना गॅस कटरने कापून त्यांचे सुटे भाग जप्त केले आहेत.

पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी आणि सरकारच्या आदेशानुसार कारवाई सुरूच राहणार आहे. - अविनाश कोष्टी, तहसीलदार, वसई

वसई तालुक्यातील पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी तहसीलदार अविनाश कोष्टी यांनी पुढाकार घेऊन, निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत पवार, महसूल तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली सर्कल, तलाठी, महसूल कर्मचारी, मेरिटाईम बोर्ड अधिकारी, कर्मचारी यांचे स्वतंत्र पथक निर्माण केले होते. ६ ते १० मे पर्यंत सलग चार दिवस शिरगाव ब्रिज क्रमांक ८८, वैतरणा खाडी ब्रिज क्रमांक ९२, ९३ या ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत आठ बोटी जप्त केल्या. त्यातील तीन बोटी पाण्यात बुडविल्या आणि दोन बोटी उद्ध्वस्त केल्या आणि तीन बोटी जप्त केल्या. आठ जप्त केलेले सक्शन पंपांपैकी पाच निकामी करून पाण्यात बुडवले. प्रत्येकी एक पंप उद्ध्वस्त आणि जप्त केला. जप्त बोटी आणि सक्शन पंप गॅस कटरने कट केले. रेती, कुंड्या, कठडे जेसीबीच्या साह्याने पुन्हा खाडीत फेकून दिल्या आहेत.



गॅस कटरने बोटी नष्ट करण्यात आल्या.

CamScanner

दि. १८/०५/२०२३

सकाळ पु. पा. न. १



# पावसाळ्यात २१ दिवस उधाणाचे

## मिरा-भाईंदर पालिकेकडून वेळापत्रक जाहीर

भाईंदर, ता. १७ (बातमीदार) : पावसाळ्यातील चार महिन्यांच्या भरती-ओहोटीचे वेळापत्रक मिरा-भाईंदर महापालिकेकडून जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार चार महिन्यांतील तब्बल २१ दिवस हे नागरिकांची चिंता वाढवणारे ठरण्याची शक्यता आहे. यादिवशी समुद्रात साडेचार मीटरपेक्षा जास्त उंचीची भरती येणार आहे. त्याचवेळी मुसळधार पाऊस झाला तर शहर तुंबण्याची भीती आहे.

मिरा, भाईंदर शहर हे समुद्रसपाटीपासून काहीसे खाली आहे. त्यामुळे समुद्रातील भरतीच्या वेळी खाडीचे पाणी शहरात शिरत असते. पावसाळ्यात मिरा, भाईंदर शहरातील पावसाचे पाणी नाल्यांवाटे खाडीला जाऊन मिळते व खाड्यांच्या मार्फत ते समुद्राला जाऊन मिळते; परंतु समुद्राला भरती असली तर पाणी समुद्रात जाण्याचा मार्ग बंद होतो. शिवाय ही भरती साडेचार मीटरपेक्षा ज़ास्त असेल तर उलट समुद्राचे पाणी खाडीवाटे आत येण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत २१ दिवस समुद्रात साडेचार मीटरपेक्षा जास्त उंचीची भरती येणार आहे. विशेष म्हणजे १ ते ३ सप्टेंबर या सलग तीन दिवशी दुपारी व रात्री अशी दोन वेळा साडेचार मीटरपेक्षा जास्त भरती असणार आहे.

महापालिकेकडून सखल भागातील पाणी उपसून काढण्यासाठी शक्तिशाली पंप बसवण्यात येतात; परंतु भरतीच्या वेळी पाणी बाहेर जाण्याचे मार्गच बंद होत असल्याने प्रशासनाचा नाईलाज होत असतो. त्यामुळे भरतीच्या या २१ दिवसांत नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### मच्छीमारांची लगबग

पावसाच्या आगमनापूर्वी १ जूनपासून दोन महिने मासेमारी बंद राहणार आहे. मासेमारी बंद होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त मासेमारी करून नफा कसा मिळवता येईल, याकडे मच्छीमारांचे लक्ष लागून आहे. मान्सून सुरू होताच उधाणाचा तडाखा लागू नये, नौका सुरक्षित स्थळी नांगरून ठेवाव्या लागतात. नौका शाकारून ठेवण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची जमवाजमव करण्यासाठी शेतकऱ्याची लगबग सुरू आहे.

### भरतीचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| ४ जून | दु. १२.४३ | ४.५ मीटर |
| ५ जून | दु. १.२८ | ४.६ मीटर |
| ६ जून | दु.२.१४ | ४.६ मीटर |
| ७ जून | दु. ३.०१ | ४.५ मीटर |
| ३ जुलै | दु. १२.३० | ४.५ मीटर |
| ४ जुलै | दु. १.१७ | ४.७ मीटर |
| ५ जुलै | दु. २.०२ | ४.८ मीटर |
| ६ जुलै | दु. २.४७ | ४.८ मीटर |
| ७ जुलै | दु. ३.३१ | ४.७ मीटर |
| ८ जुलै | दु. ४.१५ | ४.५ मीटर |
| १ ऑगस्ट | दु. १२.१६ | ४.६ मीटर |
| २ ऑगस्ट | दु. १.०० | ४.८ मीटर |
| ३ ऑगस्ट | दु. १.४२ | ४.९ मीटर |
| ४ ऑगस्ट | दु. २.२२ | ४.९ मीटर |
| ५ ऑगस्ट | दु. ३.०२ | ४.८ मीटर |
| ६ ऑगस्ट | दु. ३.३९ | ४.६ मीटर |
| ३० ऑगस्ट | स.११.५४ | ४.५ मीटर |
| ३१ ऑगस्ट | दु. १२.३४ | ४.८ मीटर |
| १ सप्टेंबर | रात्री १२.४६ | ४.५ मीटर |
| | दु.१.१३ | ४.९ मीटर |
| २ सप्टेंबर | रात्री १.३३ | ४.६ मीटर |
| | दु.१.५१ | ४.९ मीटर |
| ३ सप्टेंबर | रात्री २.११ | ४.६ मीटर |

CamScanner

दि. १८/०५/२०२२

सकाळ पु. या. न. ३

# महापालिका प्रशासनाविरोधात आंदोलन

## पेल्हार प्रभाग समितीतील कामे रखडल्याची टीका

नालासोपारा, ता. १७ (बातमीदार) : पावसाळा सुरू व्हायला काही दिवस उरले असताना वसई-विरार महापालिकेच्या पेल्हार विभागातील अनेक कामे प्रलंबित आहेत, मात्र त्याकडे पालिका प्रशासनाची डोळेझाक होत असल्याची टीका करत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे प्रवक्ता संदीप पांडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आज (ता. १७) तीव्र आंदोलन केले. अधिकारी, कर्मचारी यांचा मनमानी कारभार सुरू असल्याचे सांगत पेल्हार प्रभाग समिती एफ कार्यालयातील काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक होऊन प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.



नालासोपारा : पेल्हार विभागातील अनेक विकासकामे रखडल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांनी वसई-विरार महापालिकेच्या प्रभाग कार्यालयाबाहेर आंदोलन केले.

नालासोपारा पूर्व पेल्हार विभागात भूमाफियांकडून शासकीय जमिनी हडप करून मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत. नैसर्गिक नाले बुजवून अनेक ठिकाणी मातीभराव करून बांधकामे उभी राहिली आहेत. जबारपाडा, रिचर्ड कंपाउंड, रफिक कंपाउंड या परिसरात मोठमोठी गोडाऊन उभी करण्यात आली आहेत. मात्र पालिकेचे अधिकारी सर्व बांधकामांकडे डोळेझाक करत आहेत. त्याचा त्रास सर्वसामान्य जनतेला नाहक सहन करावा लागत आहे, अशी टीका काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

शहरातील अनेक भागातील विकासकामे पावसाळ्यापूर्वी करावीत, यासाठी महापालिका प्रशासनाकडे अनेकदा मागणी करण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले. याचा नाहक त्रास पावसाळ्यात नागरिकांना बसत आहे. प्रशासनाने नागरिकांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी संदीप पांडे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली. प्रशासनाने समस्या सोडवण्यात येतील, असे आश्वासन दिले.

### कार्यालयाच्या प्रवेशद्वाराला टाळे

आंदोलनावेळी सहायक आयुक्त कार्यालयात नसल्याने संतप्त कार्यकर्त्यांनी कार्यालयाच्या प्रवेशद्वारालाच टाळे मारले होते, पण पोलिसांच्या मध्यस्थीने टाळे उघडून सहायक आयुक्तांशी चर्चा घडवून आंदोलन शांत केले.

अनधिकृत बांधकामांमुळे नैसर्गिक नाले बुजवल्याने पावसाळ्यात थोडा जरी पाऊस पडला, तर पेल्हार विभागात पाणी साचते. पाणी नागरिकांच्या घरात शिरून मोठे नुकसान होते. पावसाळा काही दिवसांवर आला असतानाही कामे झाली नाहीत. कामे तत्काळ करावीत, या मागणीसाठी आंदोलन केले.

- संजय पांडे, प्रवक्ते,
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती



नालासोपारा : प्रभाग कार्यालयातच मनसैनिकांनी ठिय्या आंदोलन केले.

## पालिका कार्यालयातच ठिय्या

नालासोपारा, ता. १७ (बातमीदार) : नालासोपारा पश्चिमेकडील वसई विरार महापालिकेच्या प्रभाग ई कार्यालयात सहायक आयुक्त आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने शहर उपाध्यक्ष संजय मेहरा यांच्या नेतृत्वाखाली आज (ता. १७) ठिय्या आंदोलन केले. विविध मागण्यांसंदर्भात तक्रारी करूनसुद्धा पालिका प्रशासन दाद देत नसल्यामुळे आंदोलन केल्याचे सांगितले.

आरक्षित भूखंडावर अनधिकृत बांधकाम तत्काळ निष्कासित करण्यात यावे, पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई, गटार, रस्ते दुरुस्त करावे या मागण्यांसाठी आंदोलन केले. आरक्षित भूखंडावर चार वर्षांत झालेले अनधिकृत बांधकाम पाडण्यात यावे, कोणते भूखंड आरक्षित आहेत हे सार्वजनिक करावेत, यासाठी तक्रारी केल्या; पण पालिका प्रशासनाकडून माहिती मिळत नसल्यामुळे मनसे कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.

CamScanner

दि. १८/०५/२०२३

म. टा. पु. पा. नं. १

# वर्षभरात १४१ आरोपींच्या मुसक्या

## नवीन मांडवी पोलिस ठाण्याकडून २४९ गुन्ह्यांची उकल



### वर्षपूर्तीनिमित्त कार्यक्रम

मांडवी पोलिस ठाण्याला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त पोलिस ठाण्यात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी खासदार बळीराम जाधव व परिसरातील सर्व पोलिस पाटील हजर होते.

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

विरार पूर्व पट्ट्यासाठी नव्याने निर्माण झालेल्या मांडवी पोलिस ठाण्यामुळे विरार पोलिस ठाण्यावरील भार हलका झाला आहे. नुकतेच या पोलिस ठाण्याला एक वर्ष पूर्ण झाले असून मांडवी पोलिसांनी वर्षभरातच १४१ आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. या पोलिस ठाण्यातील ३३६ पैकी २४९ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

विरार पूर्वेस तुंगारेश्वर पर्वताच्या पायथ्याशी मांडवी पोलिस ठाणे मागील वर्षी मे महिन्यात सुरू करण्यात आले. हा संपूर्ण परिसर वनपट्ट्यात असल्याने गुन्ह्यावेळी पोलिसांना सहज पोहोचता यावे, यासाठी पोलिस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यात आली. प्रत्येक गावातील तरुणांना या 'ग्रामरक्षक दला'त संधी देण्यात आली आहे. सध्या या पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३२ गावे व काही पाडे आहेत. विरार पूर्वेला चाळीसगाव ते महामार्गावर भारोळ व बावखळ अशी हद्द असलेल्या या पोलिस ठाण्याच्या संपूर्ण हद्दीवर येथील पोलिसांना सहज लक्ष ठेवता येत आहे.

मांडवी पोलिस ठाण्यात वर्षभरात ३३६ दखलपात्र गुन्हे नोंदवण्यात आल्याचे सांगण्यात आले. यात २४९ गुन्ह्यांचा पोलिसांनी छडा लावला असून १४१ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच या गुन्ह्यांत एकूण ८५ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रेती उत्खननप्रकरणी २६ गुन्हे दाखल असून याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

सामना पा. न. ८

# राज्यात सामाजिक सलोखा बिघडवण्याचा कट

## संजय राऊत यांचा आरोप



नाशिक, दि. १७ (प्रतिनिधी) – नकली हिंदुत्वाच्या नावावर महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा बिघडवण्याचा कट यशस्वी होणार नाही, असा टोला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते–खासदार संजय राऊत यांनी भाजपाला हाणला.

नाशिक येथे बुधवारी खासदार संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. राज्यात अनैतिक मार्गाने सत्तेवर आलेल्यांना जनतेचा पाठिंबा मिळत नसल्याने सरकारच्या पायाखालची वाळू घसरली आहे. यामुळे नकली हिंदुत्वाच्या नावाने भजन केले जात आहे. हिंदुत्वाच्या नावाने टोळ्या निर्माण करून राज्याचे वातावरण बिघडवण्याचा कट रचला जात आहे, पण ते यशस्वी होणार नाही. कर्नाटक निवडणुकीत बजरंग बलीची गदा भाजपच्याच डोक्यात बसली, असेही ते म्हणाले. त्र्यंबकेश्वर मंदिरात संदल मिरवणुकीदरम्यान धूप दाखविण्याची परंपरा आहे. मंदिरात घुसण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही. मंदिर विश्वस्त संस्थेने कुणाच्या तरी दबावाखाली पोलिसांना पत्र दिल्याचेही त्यांनी सांगितले, आमच्याइतके कडवट हिंदुत्ववादी या देशात कोणीही नाही. त्र्यंबकेश्वर हा आमच्या श्रद्धेचा, आस्थेचा विषय आहे. अजमेर शरीफच्या दर्ग्यावर पंतप्रधानांपासून सर्वच जातात. हाजी अलीच्या दर्ग्यावर मोठ्या प्रमाणात हिंदू जातात. यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही लोकं आहेत. हा श्रद्धेचा विषय आहे. राज्यात सामाजिक सलोखा राहायला हवा, असेही संजय राऊत यांनी स्पष्ट केले.

देशद्रोही कोण हे रोज स्पष्ट होतंय. पाकिस्तानच्या हनीट्रॅपमध्ये अडकलेल्यांचे धागेदोरे नाशिकपर्यंत आले आहेत. हवाई दलाचेही लोक यात आहेत. हे सगळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहेत, असा आरोपही संजय राऊत यांनी केला. यावर एसआयटी नेमा, असेही ते म्हणाले. या सर्व प्रकरणांकडील लक्ष विचलित करण्यासाठी शेवगाव, अकोल्यात दंगली घडतायेत. त्र्यंबकेश्वरमध्ये तणाव निर्माण केला जातोय. दंगली घडविणाऱ्या टोळ्या निर्माण करून राज्यात सत्तेवरील लोकं मराठी राज्याचं नुकसान करतायेत, असे टीकास्त्र त्यांनी मिंधे–फडणवीस सरकारवर सोडले. यावेळी शिवसेना नाशिक महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, जळगाव जिल्हा संपर्कप्रमुख संजय सावंत, भारतीय कामगार सेनेचे जीवन कामत, माजी नगरसेवक विलास शिंदे, डी. जी. सूर्यवंशी आदी हजर होते.

CamScanner

दि. १८/०५/२०२३

म. टा. पा. न. ५

# ‘५५च्या पुढील पोलिसांना रस्त्यावर नेमू नये’

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

दुपारच्या रणरणत्या उन्हात कर्तव्य बजावणाऱ्या वाहतूक पोलिसांना सावलीसाठी तात्पुरता निवारा तसेच, पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, ५५ वर्षांहून अधिक वयाच्या वाहतूक पोलिसांना रस्त्यावर कर्तव्य बजावण्यासाठी तैनात करू नये, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांना दिले आहेत. आवश्यकता भासल्यास मुख्यमंत्री सहायता निधीमधून त्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्री बुधवारी दुपारी ठाण्याहून मुंबईकडे येत असताना भर उन्हात जागोजागी कर्तव्य बजावत असलेले वाहतूक पोलिस त्यांना दिसले. यातील अनेक पोलिस हे वयाने ज्येष्ठ असूनही भर उन्हात कर्तव्य बजावत असल्याचे त्यांनी पाहिले. याची गंभीर दखल घेत मुख्यमंत्र्यांनी त्याची तातडीने मुंबई पोलिस आयुक्तांना फोन केला आणि यापुढे ५५ वर्षांवरील वाहतूक पोलिसांना भर उन्हात रस्त्यावर कर्तव्य बजावण्यासाठी तैनात करू नये, असे निर्देश दिले. या वाहतूक पोलिसांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी त्यांना छत्री, तात्पुरता निवारा आणि पिण्याचे पाणी पुरवण्याची सूचना केली.

### ज्येष्ठांच्या समस्यांचा आढावा

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत बुधवारी आढावा घेतला. यावेळी विविध विभागांना ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सूचना करतानाच आरोग्य विभागाने ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी सूचनाही त्यांनी केली. या बैठकीला सार्वजनिक आरोग्यमंत्री तानाजी सावंत, बंदर विकासमंत्री दादाजी भुसे, सामाजिक न्याय विभागासह विविध विभागांचे वरीष्ठ अधिकारी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. राज्य शासनाकडून ज्येष्ठांसाठी एसटी प्रवासात सवलत देण्यात आली आहे. या सवलतींचा लाभ ज्येष्ठांनी घ्यावा. ज्येष्ठांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी विविध पोलिस ठाण्यात ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष निर्माण करण्यात आले आहेत. हे कक्ष अधिक प्रभावीपणे कार्यरत होण्यासाठी पोलिस विभागाने सर्व स्थानकांना सूचना द्याव्यात, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

म. टा. पु. पा. न. १

# ‘बुलेट’च्या कामाला वेग

## विरार येथील प्रस्तावित स्थानकाच्या जागेची जपानच्या पथकाकडून पाहणी

**मटा विशेष**

**वैष्णवी राऊत, वसई**



- विरार पूर्वेला होणार स्थानक
- विविध कामांचा आढावा
- वसईतील भूसंपादन पूर्ण

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी स्थानक उभारण्याचे काम सुरू करण्याच्या उद्देशाने हालचाली सुरू झाल्या असून, त्यातील एक स्थानक विरार येथे उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे. हे स्थानक कसे आणि कुठे उभारण्यात येणार, याबाबत जपानच्या पथकाने विरार येथे नुकतीच पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी स्थानकाच्या विविध कामांचा आढावा घेतला.

केंद्र सरकारने मुंबई आणि गुजरातला जोडणारा मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. या बुलेट ट्रेनचा मार्ग पालघर जिल्ह्यातून जाणार असून जिल्ह्यातील एकूण ७३ गावे बाधित होणार आहेत. वसई तालुक्यात हा मार्ग विरार, कोपरी, चंदनसार, नालासोपारा येथील बिलालपाडा, मोरे, पोमण, मोरी, बापाणे, ससूनवघर, नागले, सारजा मोरी, नारिंगी, जुली बेट अशा एकूण २१ गावांतून जाणार आहे. यासाठी नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशनतर्फे वसईत एकूण ७१.५२ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. त्यात ५२.७५ हेक्टर खासगी क्षेत्र असून ७.४५ हेक्टर वनक्षेत्र आणि ४.३१ हेक्टर सरकारी जमिनीचा समावेश आहे.

मुंबईतील बीकेसी ते अहमदाबादमधील साबरमती अशी एकूण १२ स्थानके या रेल्वेसाठी उभारण्यात येणार आहेत. त्यातील चार स्थानके महाराष्ट्रातील बीकेसी, ठाणे, विरार आणि बोईसर या ठिकाणी निश्चित केली आहेत. त्यापैकी विरार येथे विरार पूर्वेला स्थानक उभारण्यात येणार आहे. येथे जानेवारी महिन्यात भराव करून जमीन सपाटीकरण तसेच इतर कामे करण्यात आली होती. त्यानंतर, विकासकामांसाठी विविध देशांना वित्तपुरवठा करणाऱ्या जपानमधील सरकारी संस्थेच्या प्रतिनिधींनी विरारला नुकतीच भेट दिली. या पथकाने येथे पाहणी करत, स्थानक कसे असेल याचे सर्वेक्षण केले. यावेळी वसई विरार महापालिका, एमएमआरडीए तसेच सरकारी अधिकारी उपस्थित होते.

जपानी पथकाने पाहणीवेळी एरिया-१ म्हणजेच स्थानकांचा भाग तसेच एरिया-२ आणि ३ म्हणजे स्थानक तयार झाल्यानंतरची अन्य विकासकामे यासंदर्भात तांत्रिक बाबींचा आढावा घेतला. प्रकल्पास जागा देण्यास वसई-विरारमधील स्थानिकांचा प्रारंभी विरोध होता. मात्र आता १०० टक्के जमीन हस्तांतरित झाली असून, विरोध मावळल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बुलेटचा मार्ग मोकळा झाला आहे.

**बुलेट ट्रेन प्रकल्प हा वसई विरार महापालिका हद्दीतून जाणार आहे. या प्रकल्पासाठी एक स्थानक विरार पूर्व येथे उभारण्यात येणार आहे. त्याचा आढावा घेण्यासाठी संबंधित प्रशासनाने आणि जपानच्या सरकारी संस्थेने हा दौरा केला.**

**- वाय. एस. रेड्डी, नगररचना विभाग प्रमुख, वसई विरार महापालिका**

**“ बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी संबंधित प्रशासनातर्फे हालचाली सुरू आहेत. वसई-विरारमधून जाणाऱ्या या मार्गिकेसाठी भूसंपादन झाले आहे. विरार येथे बुलेटचे स्थानक प्रस्तावित असून त्यासाठीचा जागा पाहणी दौरा जपानच्या शिष्टमंडळाने केला. यावेळी पालिकेतर्फे संबंधित माहिती देण्यात आली.**

**- अनिलकुमार पवार, आयुक्त, वसई विरार महापालिका**

CamScanner

CamScanner

लोकसत्ता पु. पा. नं. १

# शहरात आणखी तीन नवीन अग्निशमन केंद्रे

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** वसई विरार शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता आणखी तीन नवीन अग्निशमन केंद्रे तयार करण्यात येणार आहेत. वसई नर्सरी बाग, पेल्हार आणि वालीव या तीन ठिकाणी ती उभारण्यात येणार आहेत.

वसई विरार शहरात पालिकेचे एक मुख्य अग्निशमन केंद्र, सहा उपकेंद्रे आहेत. त्यांच्यामार्फत शहरात आपत्कालीन परिस्थितीत सेवा दिली जात आहे. परंतु मागील काही वर्षांत वसई विरार शहराचे नागरीकरण वेगाने वाढत आहे.

औद्योगिक वसाहती, बैठ्या चाळी, उपाहारगृहे यांसह इतर आस्थापना यामुळे हा परिसरही अधिक दाटीवाटीचा बनला आहे. अनेकदा महामार्ग व त्यालगत आगी लागण्याच्या घटना समोर येत असतात. तर कधी कधी वाहनांना आगी, विचित्र अपघात असे प्रकारही घडतात. अशा वेळी शहरी भागातील अग्निशमन केंद्रातून सेवा पुरविली जाते. परंतु काही वेळा दूरचे अंतर, निर्माण होणारी वाहतूक कोंडी यामुळे घटनास्थळी पोहोचण्यासाठी वेळ लागतो. यासाठी पालिकेने अग्निशमन केंद्राचा विस्तार करण्यास सुरुवात केली असून विविध ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्रे तयार केली जात आहेत. सध्या पालिकेने पेल्हार, वालीव व वसई येथील नर्सरी बाग अशा तीन ठिकाणी अग्निशमन केंद्रे प्रस्तावित केली असल्याची माहिती पालिकेच्या बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.

## तात्काळ आगीवर नियंत्रण मिळविण्यास मदत

महामार्ग व महामार्गालगत असलेल्या परिसरात असलेल्या भागात आगीची किंवा इतर आपत्कालीन परिस्थिती निर्माण होते. त्या वेळी विविध अडचणींमुळे अग्निशमन दलाचे वाहन पोहोचण्यास अडचणी येतात. आता पूर्वेच्या पेल्हार व वालीव या भागात केंद्र तयार होणार असल्याने महामार्गावरील घटना यासह औद्योगिक वसाहतीत लागणाऱ्या आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यास मदत होणार आहे.

त्यामध्ये वसई नर्सरी बाग येथील केंद्राचे काम आता लवकरच सुरू केले जाणार असून या एका केंद्रासाठी सुमारे तीन कोटी रुपये इतका खर्च केला जाणार आहे. यासाठीची निविदा प्रक्रियाही झाली असल्याचे कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड यांनी सांगितले आहे.

तर इतर केंद्रे उभारणीसाठी पालिकेच्या बांधकाम विभागाचे प्रयत्न सुरू आहेत, असेही लाड यांनी सांगितले आहे. या आणखी तीन केंद्रांमुळे शहरातील केंद्रांची संख्या मुख्य अग्निशमन केंद्रांसह दहा इतकी होणार आहे.

CamScanner

# अपनी ही साजिश में फंसी महिला के खिलाफ दर्ज होगा मामला

**भास्कर संवाददाता | वसई**

वसई-पश्चिम में 10 लाख की चोरी के मामले में पुलिस ने दो आरोपियों गिरफ्तार कर किया था, लेकिन जांच में चौकाने वाला खुलासा हुआ है। दरअसल शिकायतकर्ता महिला ने प्रेमी के साथ मिलकर चोरी की साजिश रची और पुलिस स्टेशन में झूठी शिकायत दर्ज कराई थी। अब पुलिस शिकायतकर्ता महिला के खिलाफ पुलिस को गुमराह करने की कार्रवाई करने जा रही है। पुलिस उपायुक्त पूर्णिमा चौगुले-श्रींगी ने बताया कि महिला ने नसीम को घर में तोड़फोड़ करने सहित तिजोरी का ताला तोड़कर गहने चोरी करवाए। साथ ही यह मामला ठंडा होने तक



उस गहने को भाई के घर पर रखने को कहा। पुलिस इस मामले में अब कोर्ट में एक बी-सारांश रिपोर्ट दायर करेगी। जिसमें बताया गया है कि यह मामला फर्जी है, इसके बाद हम पुलिस को गुमराह करने और फर्जी मामला दर्ज करवाने में मामले में महिला के खिलाफ मामला दर्ज करेंगे।

दैनिक भास्कर
Fri, 19 May 2023
https://epaper.bhaskarhindi.com/c/72456

CS CamScanner

# अपराध शाखा 02 की टीम ने एक बड़ी कार्रवाई!

## महिला सहित 03 शातिर चोर लगे हाथ, 10 लाख से अधिक की संपत्ति बरामद

वसई : एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट की टीम ने एक ऐसी गुत्थी सुलझाई है, जिसकर आपको हैरान रह जाएंगे। दरअसल, अपराध के घटित होने के 3 दिन के भीतर क्राइम ब्रांच 2 की टीम ने अपराध में अज्ञात आरोपियों के नाम का पता लगाकर उन्हें हिरासत में लेने तथा चतुराई से सुलझाने में सफलता मिली है। इस गुत्थी को सुलझाने के लिए टीम ने तकरीबन 150 से अधिक सीसीटीवी फुटेज को खंगाला था। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 2 यूनिट के पी.आई. शाहूराज रणवरे, सपोनि सुहास कांबले व सपोनि नितिन विचारे(?) की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि 9 मई 2023 शाम 5.30 बजे से 10 मई 2023 सुबह 10.25 के दरम्यान शिकायतकर्ता निखत(?) अयाज खान (38), निवासी-बी/210, सोनी(?) अपार्टमेंट, दिवानमान, वसई प. स्थित के घर अज्ञात चोर द्वारा ताला तोड़कर, घर में प्रवेश किया और बेडरूम के कपाट की तिजोरी का लॉक तोड़कर 10,30,000 रुपये का आभूषण व नकदी चोरी कर फरार हो गया, इस मामले में शिकायतकर्ता निखत की शिकायत पर माणिकपुर थाने में अज्ञात चोर के ऊपर विविध धाराओं के तहत केस दर्ज किया गया था। पुलिस अधिकारी ने बताया कि, उक्त मामला दर्ज किये जाने की सूचना मिलते ही वरिष्ठों के आदेश पर



उक्त अपराध स्थल का मुआयना कर सी.सी.टी.वी. कैमरों के फुटेज की जांच की गई, तो अपराध में आरोपी पाया गया, घटनास्थल और तकनीकी जांच से मिले फुटेज से आरोपी का नाम पता करने के बाद उसे गिरफ्तार करने के लिए वरिष्ठों के मार्गदर्शन में अलग-अलग टीमों का गठन कर आरोपियों की तलाश शुरू की गई। उक्त अपराध में आरोपी मोहम्मद समर दीप(?) खान (28) को गोवंडी, मुंबई से हिरासत में लिया, उक्त आरोपी से की गई पूछताछ में पता चला कि उक्त अपराध उसका सहयोगी मित्र नवीद(?) मोईन खान (40), निवासी- वसई पश्चिम द्वारा उक्त अपराध किया था, ऐसा खुलासा हुआ है। उक्त आरोपी नवीद मोईन खान के मोबाइल फोन के तकनीकी विश्लेषण के अनुसार, उक्त आरोपी को क्राउन(?) होटल, पीरुबाजार(?) रोड, काशीमीरा से हिरासत में लिया गया, उपरोक्त मामला आरोपियों की विवेचना में उक्त अपराध में आरोपी शिकायतकर्ता निखत अयाज खान उम्र 38 वर्ष, निवासी- वसई पश्चिम, यह अपने पति द्वारा समय-समय पर विदेश से भेजे गए धन को खर्च करती थी, पति के लौटने के बाद खर्च की गई राशि के बारे में पति को क्या बताना है, इस असमंजस में रहना, इसी दौरान उसकी मुलाकात उसकी बिल्डिंग में रहने वाले उसके परिचित शख्स नवीद मोईन खान से हुई, उसके साथ मिलीभगत कर उसने घर में चोरी और चोरी का नाटक किया, और उक्त सोने के गहने शिकायतकर्ता द्वारा अपने भाई के घर गोवंडी(?) में रखे थे और गुम थी(?), जांच के हेतु के बाद अपराध में चोरी हुए सोने के गहने और नकदी कुल मिलाकर 10,30,000 रुपये का माल जब्त किया गया।

CamScanner

# देशी हाटभट्टी के दो शराब निर्माण परिसरों पर क्राइम ब्रांच सेल 3 विरार की कार्रवाई





**अनिरुद्ध मिश्र**

मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्र में अवैध कारोबार के खिलाफ प्रभावी कार्रवाई करने के लिए वरिष्ठों ने समय समय पर मार्गदर्शन और आदेश दिया था।

17/05/2023 को क्राइम ब्रांच रूम 3, विरार यूनिट के अधिकारियों और कर्मचारियों को गुप्त मुखबिर के माध्यम से सूचना मिली कि सुबह करीब 05.20 बजे बरफ पाड़ा खंडी, विरार पूर्व तीम के जंगल में हातभट्टी शराब का अवैध निर्माण हो रहा है. पहाड़ी की तलहटी में, प्राप्त जानकारी के अनुसार क्राइम ब्रांच रूम 3, विरार यूनिट के अधिकारियों एवं कर्मचारियों ने



कर्मचारियों के साथ मिलकर कानूनी मामले को निपटाने के बाद उक्त स्थान पर छापा मारा, जिसमें 01 अज्ञात महिला एवं 03 आरोपी मौजूद थे. पुलिस टीम की मौजूदगी को देखते हुए मौके से फरार हो गए उक्त कार्रवाई में 1) एल्युमीनियम धातु के दो प्लेट पैन (रँटेले) एवं दो एल्युमिनियम ट्यूब, 2) 200 लीटर क्षमता के 20 नीले प्लास्टिक के ड्रम एवं 20 लीटर क्षमता के 10 सफेद प्लास्टिक के डिब्बे, जिसमें कुल 4200 लीटर नवसागर गुड़ मिला हुआ है धुलाई. 3) 20 सफेद रंग के 20 लीटर अवैध गावठी हैंड फर्नेस शराब के प्लास्टिक के डिब्बे कुल 02,16,000/- रुपये की शराब बनाने के उपकरण में प्रयुक्त सामग्री को छोड़कर अन्य सामान को मौके पर ही नष्ट कर दिया गया है. उक्त मामले में 01 अज्ञात महिला एवं 03 पुरुष अभियुक्तों के विरुद्ध. हवा मुकेश रामचंद्र तटकरे अपराध शाखा कक्ष 3 की शिकायत पर विरार थाने में मामला दर्ज किया गया है। 491/2023 महाराष्ट्र निषेध अधिनियम 1949 की धारा 65 (बी) (सी) (डी) (एफ) (ई) के तहत मामला दर्ज किया गया है।

उक्त कार्यवाही अविनाश अंबुरे, पुलिस उपायुक्त (अपराध), अमोल मंडावे सहायक पुलिस आयुक्त (अपराध) के मार्गदर्शन में, अपराध शाखा कक्ष 3, विरार पी आई प्रमोद बडाख, सं. शिवाजी खाड़े, उमेश भागवत, पुलिस, हवा मुकेश तटकरे, शंकर शिंदे, अश्विन पाटिल अम्न, सुमित जाधव, एम.एस. बी. गणेश यादव, प्रवीन वानखेड़े, सागर सोनवणे ने किया।

CS CamScanner

# क्राइम ब्रांच ने फूंकी अवैध शराब की भट्टियां!



■ **निसं, विरार :** मीरा-भाईंदर वसई-विरार पुलिस आयुक्तालय की क्राइम ब्रांच यूनिट-3 ने बुधवार देर शाम विरार के बरफपाडा में चल रही अवैध शराब भट्टियों पर कार्रवाई करते हुए उन्हें आग के हवाले कर दिया। सीनियर पीआई प्रमोद बडाख की टीम ने वहां मौजूद सामग्री जब्त कर लाखों का रसायन नष्ट कर दिया। पुलिस ने एक महिला सहित पांच लोगों के खिलाफ मामला दर्ज किया है।

CS CamScanner

लोकमत

# मटका जुगाऱ्यावर पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मटका जुगार चालविल्याप्रकरणी वसईत एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोळीवाडा, साई दत्तनगर, गौसिया मशिदीजवळ आरोपी इक्बाल हुसेन शेख (५३) हा मंगळवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास उघड्यावर आकड्यांवर पैसे लावून मटका जुगार चालवत असताना वसई पोलिसांना सापडला होता. पोलिसांनी आरोपीकडील १,२२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलमाखाली वसई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 2 May 18, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# हातभट्टीची दारू तयार करणारे दोन अड्डे उदध्वस्त

## मुद्देमाल नष्ट : चार आरोपींविरोधात गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरार येथील जंगलात गावठी हातभट्टीची दारू बनविणाऱ्या दोन अड्ड्यांवर गुन्हे शाखेच्या युनिट-३ ने बुधवारी पहाटे कारवाई केली आहे. या कारवाईत हजारो रुपयांचा मुद्देमाल जागेवर नष्ट करून चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी दिली आहे.

गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पथकाला बातमीदारांकडून माहिती मिळाली की, वरफपाडा खंडी येथील जंगलात डोंगराच्या पायथ्याशी बेकायदेशीररीत्या गावठी हातभट्टीची दारू तयार होत आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकारी आणि अंमलदारांनी स्टाफसह बुधवारी छापा टाकला. येथे असलेल्या चारही आरोपींना पोलिसांची चाहूल लागताच पळून गेले. या कारवाईमध्ये दोन ॲल्युमिनियम धातूचा थाळीचा टाव व दोन ॲल्युमिनियम नळी असलेले चाटू, २०० लिटर क्षमतेचे २० प्लास्टिक ड्रम, २० लिटर क्षमतेचे १० प्लास्टिक कॅन त्यात एकूण ४२०० लिटर नवसागर गूळ मिश्रित व्हॉश, २० लिटरचे दोन कॅन त्यात २० लिटर हातभट्टी दारू,



दारू तयार करण्याची इतर साधने असा एकूण २ लाख १६ हजारांचा मुद्देमाल मिळाला आहे. तपासकामी ६ हजारांची गावठी दारू आणि दारू बनविण्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य सोडून इतर मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मुकेश रामचंद्र तटकरे यांनी चार आरोपीविरोधात विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. ही कामगिरी पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद वडाख, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे, पोलिस हवालदार मुकेश तटकरे, शंकर शिंदे अश्विन पाटील, सुमित जाधव, गणेश यादव आदींनी पार पाडली आहे.

प

करा'

Hello Vasai
Page No. 2 May 18, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner